# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**

**No,CGRF/AZ/U / 183 / 2009 / 17 /** **Date :-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer ,**
**O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

**Sub:- Forwarding of grievance in respect Shri Antayya Mallayya Perkellu, H.No.1-11-100, New Basti, Juna Bazar,Aurangabad. Consumer No. 490010541767**

**Dear Sir,**

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Antayya Mallayya Perkellu, H.No.1-11-100, New Basti, Juna Bazar,Aurangabad. Consumer No. 490010541767**

**You are requested to submit your para wise reply on the grievance within 15 days from the date of receipt of this letter along with related documents.**

**The hearing in this matter is kept on 25/02/2009 at 13=30 Hrs.**

**Encl: As above**

**Member/Secretary**
**CGRF(AZ) MSEDCL**
**Aurangabad.**

**Copy to:-**
**Shri Antayya Mallayya**
**Perkellu, H.No.1-11-100,**
**New Basti, Juna Bazar,Aurangabad.**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१८३/२००९/१७**

**तक्रार दाखल दिनांक ;- ०९/०२/२००९**
**निकाल दिनांक ;- ०८/०४/२००९**

**श्री अंतैय्या मलैय्या परकेंल्लू,**
**घर नंबर १-११-१००, नईबस्ती,**
**जुनाबाजार,औरंगाबाद.**
**(ग्राहक क्रमांक ४९००१०५४१७६७) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०९/०२/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २५/०२/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदारने घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला आहे. त्यांनी नोव्हेबर २००८ पर्यंत देण्यात आलेल्या वीज बिलाचा भरणा नियमितपणे केलेला आहे.डिसेंबर २००८ मध्ये त्यांना महावितरण कंपनीने ३०९४ युनीटचे १२४७०/-रुपयाचे वीज बिल आकारले हे वीज बिल दुरुस्त करुन द्यावे म्हणुन त्यांनी महावितरणच्या संबंधीत कार्यालयाकडे विनंती केली पण त्यांच्या तक्रारीची दखल घेण्यात न आल्यामुळे ही तक्रार मंचात दाखल केली आहे.अर्जदाराने व्याज व दंड न आकारता सुधारीत वीज बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक २५/०२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री अंतैय्या परकेल्लु व महावितरणतर्फे नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी याप्रकरणाची कागदपत्रे उपलब्ध झाली नसल्याचे कारण सांगत सुनावणीची तारीख पुढे वाढविण्याची विनंती केली ही विनंती मान्य करीत पुढील सुनावणी ०३/०३/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या तक्रारीचे निवारण होईपर्यंत त्याचा वीज पुरवठा खंडीत करु नये असा आदेश नोडल अधिकारी यांना देण्यात आला.

३) दिनांक ०३/०३/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या अहवालानुसार अर्जदाराचे मीटर दिनांक २३/०५/२००८ रोजी बदलण्यात आले व त्याप्रमाणे त्यांना वीज बिलाची आकारणी करण्यात आली.जी योग्य

असल्याचे त्यांनी म्हटले आहे.मंचाने अर्जदाराच्या सी.पी.एल.ची पाहणी केल्यानंतर त्यातील त्रुटी बाबत नोडल अधिकारी यांना विचारणा केली असता पुढील सुनावणीच्या वेळी खुलासा दाखल करण्याचे त्यांनी मान्य केले.मंचाने याप्रकणाची पुढील सुनावणी दिनांक ०७/०३/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

४) दिनांक ०७/०३/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते.अर्जदाराच्या जुन्या मीटरचे दिनांक २०/०४/२००८ ते २३/०५/२००८ या काळात १३७८ युनीट वीज वापराची नोंद केल्याचे आढळल्यामुळे हे मीटर २३/०५/२००८ रोजी बदलण्यात आलेले असल्यामुळे जुने मीटर मंचास दाखविण्याचे आदेश नोडल अधिकारी यांना देण्यात आला व पुढील सुनावणी १७/०३/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

५) दिनांक १७/०३/२००९ रोजी नोडल अधिकारी यांनी अर्जदाराचे मीटर स्टोअरमध्ये क्रिडेट केल्याचे सांगितले.त्यांनी अर्जदाराचे मीटर बदली करतांना नोंद केलेल्या रिडींग चे रजिस्टर मंचास दाखविले.दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकुण घेतल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवण्यात आले.

६) अर्जदार व नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे आढळुन येते की,अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन वीज पुरवठा घेतला असुन त्यांच्याकडे मीटर क्रमांक १०८४१९६८ बसविण्यात आले होते.महावितरणतर्फे अर्जदारास ऑक्टोबर २००७ पर्यंत नियमितपणे मीटर रिडींग प्रमाणे वीज बिल देण्यात आलेले आहे.नोव्हेबर व डिसेंबर २००७ मध्ये मागिल रिडींग १५८४१ व चालु रिडींग १५८४१ दर्शवित सरासरीवर आधारीत वीज बिल आकारण्यात आले.अर्जदाराचे वरील मीटर दिनांक २३/०५/२००८ रोजी बदलण्यात आले त्यावेळी मीटरवरील अंतिम रिडींग १७५६९ अशी असल्याचे नोंद आहे यावरुन नोव्हेबर २००७ ते २३/०५/२००८ या कालावधीत या मीटरवर १७५६९-१५८४१=१७२८ असा वीज वापर नोंदविला गेला आहे. तसेच नवीन मीटरवरील सुरुवातीचे

रिडींग ००२ अशी आहे व त्याच मीटरचे डिसेंबर २००८ सी.पी.एल.नुसार १७१८ रिडींगची नोंद आढळुन येते.यावरुन अर्जदाराचा २३/०५/२००८ ते डिसेबर या कालावधीत वीज वापर १७०८-०२ =१७१६ असल्याचे युनीट असल्याचे स्पष्ट होते.डिसेंबर २००८ नंतर अर्जदारास देण्यात आलेली वीज बिले योग्य असल्याची आढळुन येते.

वरील निरीक्षणावरुन अर्जदारास नोव्हेबर २००७ ते २३/०५/२००८ तसेच २३/०५/२००८ ते डिसेंबर २००८ या काळात नोंदविण्यात आलेला एकुण वीज वापर अनुक्रमे १७२८ व १७१६ युनीट हा त्याकाळात विभागुन देण्यात यावा असे मंचाचे मत आहे.अर्जदाराने मंचात दाखल केलेली तक्रार योग्य असुन मंच याप्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) अर्जदारास नोव्हेबर २००७ ते २३/०५/२००८ या कालावधीसाठी १७२८ युनीट तसेच २३/०५/२००८ ते डिसेंबर २००८ या काळासाठी १७१६ युनीट वीज बिल विभागुन ३० दिवसात सुधारीत वीज बिल देण्यात यावे.

२) वरील प्रमाणे देण्यात येणा-या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारु नये.तसेच अर्जदाराने या आधी भरलेल्या रक्कमेची वजावट सुधारीत वीज बिलातुन करावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

**हेमंत अ. कापडिया**
**सदस्य**

**प्र. अ. सगणे**
**सदस्य/सचिव**

**विष्णु अं. हंबिरे**
**अध्यक्ष**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१८३/२००९/१७** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री अंतैय्या मलैय्या परकेंल्लू,**
**घर नंबर १-११-१००, नईबस्ती,**
**जुनाबाजार,औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१८३/२००९/१७ )

आपण दिनांक ०९/०२/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**